# प्रास्ताविक

कथांचे विश्व हे शाश्वत आहे. सा-या जगात कथ्ांचा प्रसार हजारो वषापासून आहे. प्राचीन काळी कथांच्या माध्यमाचा प्रयोग मानवी जीवनाला आनंदमय , उदबोधक ,प्रेरक व मार्गदर्शक स्वरुपैंत होत आला. शिक्षणांचे प्रभावी माध्यम म्हणून कथांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

कथांना जाती-धर्माचे , देशांचे बंधन नाही. ज्या ज्या थोर पुरुषांनी धर्मप्रसार केला त्यांनी कथ्ांच्या स्वरुपात धर्म , निती, संस्कार व परंपरा यांची पाठराखण केली. जैन ,बौघ्द व वैदिहक धर्मगुरुंनी भारतात कथांच्या माध्यमाचा उपयोग करुन ख-या अर्थाने लौंक शिक्षणाचे मोठे कार्य केले आहे.

म. महावीरांनी हजारो लोकथांचा उपयोग अहिंसा,सत्य,अचौर्य,अपरिग्रह, व ब्रम्हचर्य या पाच अणुव्रतांच्या प्रचारासाठी व मद्य ,मांस ,सात प्रकाराची व्यसने यांच्या त्यागासाठी , क्षमा-मार्दव, आर्जव, शुचिना, संयम, तप, त्याग, आर्किंचन्य व ब्रम्हचर्य यांची आवश्यकता प्रतिपादण्यासाठी केला. त्याच कथांचा आधार घेऊन पुराणांची रचना झाली. महाकाव्ये अवतरली. अशा प्रकारे कथा साहित्य विस्तारीत गेले.

आजही कथांचे आकर्षण मोठे आहे. सर्व विश्वात कथाकारांनी आपल्या प्रभावशैलीने कथांचे स्वरुप, मांडणी, रचना, मानसिक व भावनात्मक विविधता यांची सांगड घालून त्या कथांना नवे ओजस्वी, तेजस्वि रुप प्रदान केले आहे.

आम्ही देखील श्री स्वयंभू प्रकाशनांच्या वतीने कथा-सौरभ हे प्रेरणादायी, आकर्षक व नवनव्या विषयांना, भावनांना स्पर्श करणारे पुस्तक छापले. सर्वच स्तरातील लोकांनी त्या पुस्तकाची तोंडभर स्तुती केली.

आता हे मयूर-पिच्छी नावाचे कथा पुस्तक सादर करीत आहोत. मयूर-पिच्छी म्हणजे मोराच्या पिसांना एकत्र करुन तयार केलेली आकर्षक वस्तु असते. जैन साधु हे पिच्छी व कमंडलू घेवून भारतभर विहार करतात. पिच्छी हे स्वच्छतेचे व जीवपर्यावरण रक्षणाचे प्रतीक आहे. स्वच्छतरोबरच जीव-जंतूंचा नाश होऊ नये, त्यांचे रक्षण व्हावे ही भावना त्यात निहीत आहे.

या कथासंग्रहातील अनेक सुंदर सुंदर कथातून मानवी जीवनाला हळूवारपणे सुंदर संस्कारांचे अलंकार प्रदान करण्याचे कार्य पार पाडले आहे. साध्या, सोप्या, सुबोध पण आकर्षक स्वरुपातील या कथा वाचकांना आवडतील, या शंका नाही.

याही कथासंग्रहाचे आपण स्वागत करावे . यैतील कथा पुराणातरीच्या, व्रतांच्या कथा-संग्रहातील आहेत. ब्रहत कथा-कोष हा ग्रंथ उत्तमोत्तम बहरलेला आहे. त्यातील निवडक कथांनाही यात स्थान दिले आहे . वाचा तर मग.

संपादिका